www.aiche.org/ccps

Process Safety Beacon — १० वा वर्धापन दिन

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx

**Messages for Manufacturing Personnel**


या आवृत्तीचे प्रायोजक

ioMosaic


www.iomosaic.com

# यांत्रिकी एकसंधता – बोल्ट्स खूप लहान आहेत

**फेब्रूवारी २०१२**







## … किंवा ते बसविलेलेच नाहीत!



ही छायाचित्रे एका संयंत्राच्या सुरक्षा तपासणीमध्ये आढळून आलेल्या बोल्टने फ्लँजेसच्या चुकीच्या पध्दतीने केलेल्या जोडणीची आहेत. वरील छायाचित्रांमध्ये काही किंवा सर्वच बोल्ट्स तोकडे आहेत आणि नट्स बोल्ट्सवर पूर्ण बसविलेले नाहीत. याचा अर्थ असा की जोडणी हवी तेवढी मजबूत नाही. फ्लँजेसची संरचना अशी असते की सर्व नटबोल्ट्स एकत्रितपणे फ्लँजेसवरील दाब पेलतात. जर नट बोल्टवर अर्धवट चढविला असेल तर जोडणी पुरेशी मजबूत राहणार नाही.

डावीकडील छायाचित्रात चारपैकी दोन ब्रल्ट्स गहाळ होते. या फ्लँजेसचा मजबूतपणा पाइपिंगची संरचना करणाऱ्याला अपेक्षित मजबूतपणाच्या फक्त अर्धाच असणार!

## आपण काय करू शकता?

- जर आपल्या कार्यक्षेत उपकरणांची जोडणी करणे, मॅनहोलची झाकणे जोडणे किंवा उपकरणांवरील अन्य जोडणी करणे, किंवा उपकरणांची अन्य जोडणी करणे अशा कामांचा समावेश असेल तर ध्यानात ठेवा की जोपर्यंत नट–बोल्ट्स व्यवस्थित बसवून घट्ट आवळले जात नाहीत तोपर्यंत तुमचे काम पूर्ण होत नाही.
- काही उपकरणांचे बोल्ट घट्ट करण्याची खास पध्दत असते उदाहरणार्थ बोल्ट ठराविक प्रमाणात घट्ट करण्यासाठी तुम्हाला टॉर्क रेंच वापरावा लागू शकतो,किंवा बोल्ट ठराविक क्रमाने घट्ट करावे लागत असतील. तुम्ही योग्य पध्दतीचा अवलंब करताहात ना योग्य हत्यारे वापरत आहात ना, उपकरणे जोडणीच्या कामासाठी तुम्ही प्रशिक्षित आहात ना याची खात्री करा,
- आपल्या सुरक्षा तपासणीचा एक भाग म्हणून आपल्या संयंत्रातील पाइप्स व उपकरणे यांचे फ्लँज जोडण्या व्यवस्थित असण्याबाबत तपासणी करा. एक साधं मार्गदर्शन म्हणजे जे बोल्टस नटच्या बाहेर आले नसतील त्याचा आढावा क्राफ्ट्समन किंवा अभियंत्याने ध्यायला हवा.
- व्यास्थित बोल्टींग न केलेल्या फ्लँज जोडण्या आपल्या पाहण्यात आल्यास त्यांची माहिती द्या म्हणजे त्या दुरूस्त केल्या जाऊ शकतील आणि आवश्यक ती दुरूस्ती केली जात असल्याची खात्री करा.
- नवीन किंवा देखभालीनंतर पुन्हा जोडणी केलेल्या उपकरणांची तपासणी करा आणि अशी उपकरणे सुरू करण्यापूर्वी खात्री करा की ती तंतोतत जोडली आहेत बोल्ट्स व्यवस्थित लावले आहेत.

***काम पूर्ण करा – फ्लँजेसची जोडणी व्यवस्थित केल्याची खात्री करा.***

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.